MHWS080014122024

**फौजदारी किरकोळ अर्ज १७०/२०२४ सुषमा ..वि.. विक्की मधील नि. क्र.४ खालील आदेश**

अर्जदार हिने सदरचा अर्ज फौ.प्र.सं. कलम १२५ अन्वये अंतरीम पोटगी रक्कम रुपये १५०००/– दरमहा मिळण्याकरीता  दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की,**

०२. अर्जदार ही गैरअर्जदार ची कायदेशीर पत्नी आहे. त्यांचा विवाह समाजातील रितीरिवाजानुसार दि.२६/०५/२०२२ रोजी मौजे बोरखेडी, ता. रिसोड, जि. वाशिम येथे झालेला आहे. लग्नाचा सर्व खर्च अर्जदाराच्या माहेरच्यांनी केला. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदायला गेल्यानंतर सुरुवातीचे एक महिना गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबीयांनी अर्जदारास चांगली वागणूक दिली. त्यानंतर मात्र लहान सहान कारणांवरुन गैरअर्जदार व त्यांच्या कुटूंबीयांनी अर्जदारास त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार हा अर्जदाराला काही एक न सांगता घराबाहेर निघून जात असे व रात्री अपरात्री घरी येत असे, त्याबाबत अर्जदाराने गैरअर्जदाराला विचारले असता, गैरअर्जदाराने परस्त्रीशी अनैतिक संबंध असल्याने सांगून अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करीत होता. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदार हिला गाडी घेण्याकरिता रु.५,००,०००/– ची बेकायदेशीर मागणी करु लागता. अर्जदाराने गैरअर्जदार हिला समजाविण्याचा प्रयत्न केला असता, गैरअर्जदार अर्जदार हिला मारहाण करीत असे व अर्जदाराला म्हणत असे की, अर्जदाराने जर गैरअर्जदाराची पैशाची मागणी पुर्ण केली तरच तो तिला नांदवेल अन्यथा त्याला अर्जदाराची गरज नाही.  सदर बेकायदेशीर पैशाच्या मागणीस गैरअर्जदाराचे कुटुंबीय प्रोत्साहन देत असत. दि.१०/०३/२०२४ रोजी गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबीयांनी अर्जदाराला वारंवार पैशाच्या

मागणीवरुन अश्लील शिवीगाळ करुन बेदम मारहाण केली व घराबाहेर काढून धमकी दिली की, अर्जदार ही बिना पैशाची गैरअर्जदाराच्या दारात आली तर गैरअर्जदार हे तिचा जीव घेतील. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारास नांदायला न्यावे याकरिता अर्जदार व तिच्या माहेरच्यांनी बरेच प्रयत्न केले मात्र गैरअर्जदाराने त्यास नकार दिला.

३. त्यानंतर दि.०९.१०.२०२४ रोजी गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय संगणमत करुन अर्जदाराच्या माहेरी मौजे बोरखेडी येथे आले व अर्जदार व तिच्या कुटुंबियांसोबत पैशाचे मागणीवरुन वाद घातला. अर्जदार व तिचे वडिलांनी गैरअर्जदाराला समजावण्याचा प्रयत्न केला असता, गैरअर्जदाराने अर्जदार हिला तिच्या कुटुंबियांसमक्ष मारहाण केली व गैरअर्जदाराच्या कुटुंबीयांनी अर्जदाराच्या कुटुंबियांसोबत लोटलाट केली व म्हणाले की, अर्जदार व तिचे कुटुंबिय पैशाची मागणी पुर्ण करत नाहीत, म्हणूण गैरअर्जदारांना अर्जदार हिच्यापासून फारकती पाहिजे. अर्जदार जर बिना पैशाची नांदायला आली, तर आम्ही तिचा जीव घेवून टाकू, असे म्हणून गैरअर्जदार तेथून निघून गेले. गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा सासरी व माहेरी येवून सतत शारिरीक व मानसिक छळ केला, सदरचा त्रास असहाय्य झाल्याने अर्जदार हिने गैरअर्जदारांविरुध्द पोलीस स्टेशन, रिसोड येथे रिपोर्ट दिला.

४. गैरअर्जदाराच्या कुटूंबीयानी अर्जदारासोबत भांडण करुन अर्जदारास बेदम मारहाण केली, गाडी घेण्यासाठी पाच लाख रुपयाची बेकायदेशीर मागणी केली व अर्जदाराला घराबाहेर काढुन दिले. तेव्हापासुन अर्जदार ही तिचे आई-वडीलांकडे तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार हिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. अर्जदार हिला खाणे-पिणे, कपडलत्ते, औषधपाणी, राहणे व अन्य बाबींसाठी दरमहा १५,०००/- एवढा खर्च येतो. तो खर्च करण्यास अर्जदार ही

असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदार हा इलेक्टीक ठेकेदार व वाय फाय जोडणीचा ठेकेदार असून त्यास दरमहा रु.८०,०००/– मिळतात तसेच मौजे बिळाशी, ता. शिराळा, जि. सांगली येथे बागायती शेतजमीन असून त्यामधुन त्यांना वर्षाकाठी रु.७,००,०००/– उत्पन्न मिळते. त्यामुळे अंतरिम खावटी म्हणुन अर्जदार हिला दरमहा रु.१५०००/– देण्याविषयी विनंती केली आहे.

५. गैरअर्जदार हा प्रस्तुत प्रकरणी हजर झाला मात्र त्यांने मुळ अर्जास व अंतरिम अर्जास आपले म्हणणे दिले नसल्यामुळे सदरचा अर्ज विना म्हणणे पुढे चालविण्यात आला.

६. अर्जदार यांच्या कथनानुसार खालील मुद्दे विचारार्थी आले, त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही विनंती प्रमाणे गैरअर्जदाराकडुन दरम्यानची अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

७. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. पंडीत यांचा युक्तीवाद ऐकला.

८. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जात अर्जदाराने गैरअर्जदाराविरूद्ध वेगवेगळे आरोप केलेले आहेत. त्याबाबत सत्यता पडताळण्याकरिता सदर प्रकरणी चौकशी होऊन उभयतांबद्दल योग्य तो पूरावा नोंदवून निर्णय दिला जाणार आहे. मात्र अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असुन ती सद्य परिस्थितीत तिच्या माहेरी राहण्यास आहे असे दिसून येते.

९. सदरचा अर्ज हा अर्जदाराने अंतरीम पोटगीसाठी दाखल केला असल्याने अर्जदाराने गैरअर्जदारासोबतचे नातेसंबंध व गैरअर्जदाराचे उत्पनाबाबत कोणते साधन आहे का हे शाबीत करणे जरुरीचे आहे. अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी असून ती सद्या तिच्या माहेरी राहत असल्याबाबत तसेच दरम्यानच्या काळात गैरअर्जदार यांच्याकडून अर्जदार हिच्या पालनपोषणाची किंवा त्या अनुषंगाने लागणा–या संभाव्य खर्चाची कोणतीही व्यवस्था गैरअर्जदार यांच्यामार्फत करण्यात आलेली नाही असे अर्जदाराच्या कथ्नावरुन दिसून येते. अर्जदार हिने शपथपत्रान्वये ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे कथन केले आहे. तसेच गैरअर्जदार हा इलेक्टीक ठेकेदार व वाय फाय जोडणीचा ठेकेदार असून त्यास दरमहा रु.८०,०००/– मिळतात तसेच त्याच्या शेतजमीन मधुन त्यांना वर्षाकाठी रु.७,००,०००/– उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. मात्र अर्जदाराने त्याबबात कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१०. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे. तीच्या पालनपोषणाची, वस्त्र निवा–याची, औषध–पाण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदाराची आहे ती त्याला टाळता येणार नाही. जरी अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाविषयी कागदोपत्री पुरावा दाखल केला नसला तरी अर्जदाराने शपथेवर गैरअर्जदाराच्या उत्पन्नाविषयी कथन केलेले आहे. त्यावर अविष्वास दाखविण्याचे कोणतेही कारण नाही. याउलट गैरअर्जदार याने पुरेसी संधी देवून देखील त्याचे म्हणणे सादर केले नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार ही अंतरीम आदेशाच्या स्वरुपात गैरअर्जदाराकडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. अर्जदार हिला मिळणारी अंतरीम पोटगी ही सदरचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून अर्जदार हिला देणे न्यायोचीत होणार आहे. अर्जदाराचे वय, त्यासाठी लागणा–या अत्यावश्यक व मुलभुत गरजा, त्यांच्या पुर्ततेसाठी लागणारी संभावीत खर्चाची रक्कम, महागाई तसेच अर्जदार हिला

मिळणारे उत्पन्न या इतर बाबींचा सारासार विचार करुन गैरअर्जदाराने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये २,०००/- (अक्षरी दोन हजार रूपये फक्त) अंतरीम पोटगी म्हणून देण्यास जबाबदार आहे. अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. (प्रस्तुत अर्जावर आदेश पारित करतांना म.सं.कौ.हिं.का.अर्ज ४४/२०२४ मधील नि.क्र.४ वर पारित केलेला आदेश विचारात घेतलेला आहे.) सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यास आदेशीत करण्यात येते की, त्याने सदर अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्ज निकाली होईपर्यंत अर्जदार हिस अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रूपये २,०००/- (अक्षरी दोन हजार रूपये फक्त) दयावेत.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विना मोबदला देण्यात यावी.

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.08.04 17:48:45 +0530

रिसोड.
दिनांक ०५-०७-२०२५

**(दिनेश मु. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२,रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original **Judgment.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | B. V. Bhisade (Grade III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 05.07.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 18.07.2025 |
| Order uploaded on | : | 21.07.2025 |